SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

## Golden Jubilee Year 2019-20 of

# Department of Political Science

&

# Shivaji University Political Science Association

# Conference Prociding of Two Days National Seminar

&

## 37th Maharashtra Political Science & Public Administration Conference

# "Contemporary Issues in Political Science"

**10th & 11th January 2020**



Navjyot

ISSN - 2277 - 8063

**International Interdisciplinary research Journal**

**(Humanities, Social Sciences, languages, Commerce & Management)**

130

| | | | |
|---|---|---|---|
| 137 | Regional Organisations In World Politics | Dr. Vinay P. Raut | 526-530 |
| 139 | New Trends in International Politics in East-West Relations Contributions to Peace | Dr.Abhijit Sushilkumar Patil. | 531-536 |
| 140 | आंतरराष्ट्रीय राजकारण आणि पर्यावरणीय समस्या | प्रा. डी.डी. ठाकरे | 537-540 |
| 141 | जागतिक तापमानवाढ : कारणे व उपाययोजना | डॉ. पंडित शेषराव नलावडे | 541-543 |
| 142 | पंडित जवाहरलाल नेहरु आणि भारताचे परराष्ट्र धोरण | प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके | 544-545 |
| 143 | २१ व्या शतकातील बहुध्रुवी विश्वरचना—एक अभ्यास | भालचंद्र नागनाथ बिचितकर | 546-549 |
| 144 | जागतिकीकरण व भारतीय शेतकरी | प्रा.डॉ.विजयकुमार सोन्नर | 550-552 |
| 145 | ब्रिक्स संघटना आणि भारताची भुमिका | डॉ किशोर जगन्नाथ गटकळ | 553-555 |
| 146 | क्षेत्रिय संघटना आणि भारताची भुमिका | डॉ पवार बाबासाहेब नानासाहेब | 556-558 |
| 147 | जागतिक राजकारणातील प्रादेशिक संघटना | डॉ.अशोक मारोती इंगोले | 559-561 |
| 148 | भारताने जागतिक तापमानवाढ पर्यावरणाचे रक्षण व प्रदूषण प्रतिबंधाबाबत केलेल्या विविध उपाययोजनाचे अध्ययन | डॉ. मनिषा यादव | 562-565 |
| 149 | दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना (सार्क) यश अपयश | डॉ. कल्याण आश्रु वरळे | 566-572 |
| 150 | भारतीय परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात अलिप्ततावादी चळवळीची प्रासंगिकता | डॉ. सुखदेव स. उंदरे | 573-575 |
| 151 | पर्यावरणवाद आणि रक्षणासाठीचे जागतिक प्रयत्न | नितीन शिंदे | 576-578 |
| 152 | आंतरराष्ट्रीय राजकारणातील समकालीन मुद्दे स्थलांतरण, नागरिकत्व व ओळख | श्री. बसनदास हिरा नोले | 579-585 |
| 153 | जागतिक तापमान वाढ संबंधी संयुक्त राष्ट्र संघाच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रयत्न | प्रा.डॉ.विजय जालिंदर देठे | 586-588 |
| 154 | जागतिक तापमानवाढ आणि पर्यावरणाचा ऱ्हास | प्रा.दिनेश दौलत हळदे | 589-591 |
| 155 | समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारणातील नवीन प्रवाह : बहुराष्ट्रीय निगमचा प्रभाव | दौलत भुजंगा साळवे, डॉ.आण्णासाहेब हरदारे | 592-594 |
| 156 | सार्क : राजकीय स्थितंतरे व जागतिक राजकारण | प्रा.डॉ.संजय पाटील | 595-597 |
| 157 | आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताच्या दृष्टीने शांघाई प्रादेशिक संघटनाच्या भूमिकेचा आढावा | प्रा.बाळासाहेब बजरंग सरगर | 598-600 |
| 158 | भारताच्या परराष्ट्र धोरणाची निती आणि शेजारील राष्ट्र संबंध | प्रा.भागवत शंकर महाले | 601-606 |



131

| | | | |
|---|---|---|---|
| 136 | Impact of Globalization on the Politics of Environment | Asst. Prof –Laxman Marot Ghotekar, | 523-525 |
| 137 | Regional Organisations In World Politics | Dr. Vinay P. Raut | 526-530 |
| 139 | New Trends in International Politics in East-West Relations Contributions to Peace | Dr.Abhijit Sushilkumar Patil. | 531-536 |
| 140 | vkrjjk"Vh; jktdkj.k vkf.k i;kbj.kh; lel;k | çk- Mh-Mh- Bkdj | 537-540 |
| 141 | tkxfrd rkiekuok< % dkj.ks o mik; ;kstuk | Mk- ifMr 'kskjko uykoM | 541-543 |
| 142 | ifMr tokgjyky ug# vkf.k Hkkjrkps ijjk"V¹ /kkj.k | ikpk; Z MkW quk frMds | 544-545 |
| 143 | 21 0;k 'krdkrhy cgqfkph fo'ojpuk&,d vH;kl | Hkkypanz ukxukFk fcfprdj | 546-549 |
| 144 | जागतिकीकरण व भारतीय शेतकरी | प्रा.डॉ.विजयकुमार सोन्नर | 550-552 |
| 145 | fcDl l ãkVuk vkf.k Hkkjrkph Hkwfedk | MkWfd'kkj txUukFk xVdG | 553-555 |
| 146 | {kS=; l ãkVuk vkf.k Hkkjrkph Hkwfedk | MkWi okj ckckl kgc ukukl kgc | 556-558 |
| 147 | tkxfrd jktdkj.kkrhy iknf'kd l ãkVuk | Mk-v'kksd ekjkrh bxksy | 559-561 |
| 148 | Hkkjrkus tkxfrd rkiekuok< lk;kbj.kkps j{k.k o inw.k ifrcaèkkckcr dsysY;k fofo/k mik; ;kstukps v/;;u | Mk- efu"kk ;kno | 562-565 |
| 149 | nf{k.k vkf'k;kbZ iknf'kd lgdk;Z l ãkVuk ¼l kdZ½ ;'k vi;'k | Mk- dY;k.k vkJq ojG | 566-572 |
| 150 | Hkkjrh; ijjk"V¹ /kkj.kkP;k l mHkkZr vfyIrrkoknh pGoGhph iklfxdrk | Mk- lq{kno l- mnjs | 573-575 |
| 151 | lk;kbj.kokn vkf.k j{k.kkl kBhps tkxfrd iz Ru | furhu f'kns | 576-578 |
| 152 | vkrjjk"Vh; jktdkj.kkrhy l edkyhu eqnnsLFkykrj.k] ukxfjdRo o vkG[k | Jh- cl unkl fgjk ukxs | 579-585 |
| 153 | tkxfrd rkieku ok< lcaèkh la Dr jk"V¹ l ãkP;k vkrjjk"Vh; jktdkj.kkrhy iz Ru | ik-MkWfot; tkfynj nBs | 586-588 |
| 154 | tkxfrd rkiekuok< vkf.k i;kbj.kkpk Ûgkl | ik-fnusk k nkSyr gGn | 589-591 |
| 155 | l edkyhu vkrjjk"Vh; jktdkj.kkrhy uohu iokg % cgqjk"Vh; fuxepk iHkko | nkSyr Hkqtaxk l kGos MkWvk..kkl kgc gjnkjs | 592-594 |
| 156 | l kdZ % jktdh; fLFkrarjs o tkxfrd jktdkj.k | ik-Mk-l at; ikVhy | 595-597 |
| 157 | vkrjjk"Vh; jktdkj.kkr HkkjrkP;k n"Vhus 'kkaãkbZ iknf'kd l ãkVukP;k Hkwfedpk vk<kok | ik-ckGkl kgc ctjax l jxj | 598-600 |
| 158 | HkkjrkP;k ijjk"V¹ /kkj.kkph furh vkf.k 'kstkjhy jk"V¹ lcaèk | ik-Hkkxor 'kadj egky | 601-606 |

# समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारणातील नवीन प्रवाह : बहुराष्ट्रीय निगमचा प्रभाव

दौलत भुजंगा साळवे , संशोधक विद्यार्थी , राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हपूर.
डॉ.आण्णासाहेब हरदारे, सहाय्यक प्राध्यापक,शिवराज महाविद्यालय,गडहिंग्लज.

**प्रस्तावना :**

एकाच राष्ट्रात धंदा करणाऱ्या निगमापेक्षा अनेक राष्ट्रांमध्ये धंदा करणाऱ्या महाकाय बहुराष्ट्रीय (मल्टिनॅशनल) निगम अनेक अर्थानी ताकदवर असतात. हे निगम दोन प्रकारात विभागता येतील. एकराष्ट्रीय निगमापेक्षा बहुराष्ट्रीय निगम तीन बाबतींत वेगळ्या सिद्ध होतात. त्यामध्ये ते महाकाय आर्थिक ताकद, बहुराष्ट्रीयत्व आणि आंतरराष्ट्रीय संस्था-नेटवर्कच्या बाबतीत केंद्रस्थानी असतात. तांत्रिकदृष्ट्या जगात जवळपास ४० हजार बहुराष्ट्रीय निगम असतील. पण महाकाय बहुराष्ट्रीय निगम फक्त तीनशे-चारशेच्या घरात असतील. प्रत्येक राष्ट्राचे किमान वेतन, प्रदूषण, आयात-निर्यात, आयकरविषयक कायदे असतात. ते बनवण्याचा विशेषाधिकार फक्त त्या राष्ट्राच्या शासनाकडे असतो. कंपनी कितीही मोठी झाली तरी तो विशेषाधिकार तिच्याकडे कधीच जात नाही. खरे तर या कायद्यांचे भलेबुरे परिणाम दोन्ही गटांतील कंपन्यांवर होतात. पण बहुराष्ट्रीय कंपन्यांची गोष्टच वेगळी. कायदे बनविण्याचा अधिकार गाजवणाऱ्या एकल राष्ट्रांना 'कोणते कायदे करा वा करू नका' हे सांगण्याची त्यांची कुवत असते. यामुळेच समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारणातील नवीन प्रवाहात या बहुराष्ट्रीय निगमचा प्रभाव वाढत असल्याचे दिसून येते.

**बहुराष्ट्रीय निगम :**

दोन किंवा दोहोंपेक्षा अधिक देशांत संलग्नत उत्पादनसंख्या उभारून उत्पादक मत्तांचे स्वामित्व व नियंत्रण करणारे निगम. यांनाच 'मल्टी नॅशनल कॉर्पोरेशन्स' (एमएन्सीज) किंवा 'ट्रान्स-नॅशनल कॉर्पोरेशन्स' (टीएन्सीज) असे म्हटले जाते. यात राष्ट्राराष्ट्रातील सीमा अस्तित्वात नसणारी कल्पना आहे. बहुराष्ट्रीय निगम म्हणजे वसाहतवादी राष्ट्रांनी स्थापन केलेल्या ईस्ट इंडिया कंपनीसारख्या व्यापारी निगम होत तथापि त्यांचे स्वरूप व प्रभाव अधुनिक बहुराष्ट्रीय निगमांपेक्षा वेगळा असते.

**बहुराष्ट्रीय निगमचा उदय :**

१८५० नंतर तीव्र स्पर्धेमुळे डबघाईला आलेल्या अमेरिकन कंपन्यांचे विलीनीकरण होऊन उदयास आलेल्या कंपन्यांचे स्वरूप हळूहळू बहुराष्ट्रीय बनत गेले. १९४८ ते १९५२ यादरम्यान मार्शल योजनेखाली अमेरिकन भांडवलाचा प्रचंड ओघ यूरोपीय देशांकडे वळून, अमेरिकन मालाला मोठ्या प्रमाणावर मागणी निर्माण होण्याइतपत तेथील दरडोई उत्पन्न वाढले. त्यातच यूरोपीय देशांमधील वेतनदर तुलनेने कमी असल्याने व काही प्रमाणात प्रदूषणासंबंधीचे अमेरिकेतील कायदे जाचक वाटू लागल्याने अमेरिकन कंपन्यांनी यूरोपात संलग्नं निगम स्थापून उत्पादनाला प्रारंभ केला. यातूनच आजच्या काही मोठ्या बहुराष्ट्रीय निगमांचा उदय झालेला आहे.

**बहुराष्ट्रीय निगमचा लक्षणे:** बहुराष्ट्रीय निगमचाकडे अनेक अब्ज डॉलर्सची विक्री व मालमत्ता आहे ज्यामुळे त्यांना नेहमीपेक्षा अधिक नफा मिळतो. बहुराष्ट्रीय उद्योग इतर कंपन्यांना विलीन करून किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली घेऊन अधिक शक्ती प्राप्त करतात, उत्पादनापासून विपणन, वित्त आणि व्यवस्थापन या काळात जटिल अधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश आहे. अशा संस्थांचे नियंत्रण एखाद्या संस्थेच्या ताब्यातच आहे, परंतु त्याची स्वारस्ये आणि कार्ये राष्ट्रीय सीमांवर पसरली असतात. तसेच हे निगम योगायोगाने आंतरराष्ट्रीय झाल्या आहेत.

**बहुराष्ट्रीय निगमचा विस्तार :**

जागतिक स्तरावर सध्या बहुराष्ट्रीय निगमचा विस्तार वाढत असलेला दिसतो. जगामध्ये वार्षिक विक्रीची उलाढाल प्रत्येकी किमान १० कोटी डॉलर असलेले ८०० हून अधिक बहुराष्ट्रीय निगम आहेत. त्यांपैकी ८० टक्के निगम अमेरिकेची संयुक्त संस्थाने, ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, पश्चिम जर्मनी या देशांमधील असून उर्वरित निगम जपान, स्वित्झर्लंड, नेदर्लंड्स, इटली यासारख्या देशातील आहेत. बहुराष्ट्रीय निगमांची संशोधन व विकास कार्यावर खर्च करण्याची क्षमता प्रचंड असल्याने उत्पादन-तंत्रातील बदलांशी त्यांना लगेच जुळवून घेता येते. विकसनशील देशांतील उपलब्ध कौशल्ये आपल्या सेवेत राबविल्यामुळे त्यांना कोणत्याही स्थानिक परिस्थितीशी जुळवून घेण्यात अडचण येत नाही. त्यांचे भांडवली सामर्थ्य, उच्च कोटीचे तंत्रज्ञान आणि संघटन कौशल्य यामुळे त्यांना स्पर्धक निर्माण होऊ शकत नाहीत. अमेरिकेतही मोटारगाड्या, तेलशुद्धीकरण, रबर इ. उद्योगातील एकूण विक्रीपैकी ५०% हून अधिक विक्री



PRINCIPAL
Shivaraj College of Arts,Commerce
& D.S.Kadam Science College,
GADHINGLAJ (Dist.Kolhapur)

133

बहुराष्ट्रीय निगमांकडून केली जाते. मागास देशांना भांडवलाचा पुरवठा करण्याचे कार्य बहुराष्ट्रीय निगम करतात. ते आपल्या शाखांमार्फत विकसित देशांतील व्यवस्थापकीय अनुभव व तंत्रज्ञान यांचा लाभ तसेच विकसित देशातील बाजारपेठात त्यांना प्रवेश मिळवून देतात, असे या निगमांचे काही फायदे हार्व्हर्ड विद्यापीठाचे प्रा. के. नाय् यांनी नमूद केले आहेत. काही बहुराष्ट्रीय निगम प्रथम विकसनशील देशांतील कंपन्याना तंत्रज्ञान पुरवितात हे खरे, परंतु त्या मोबदल्यात यजमान राष्ट्रातील कंपन्यांच्या भांडवलाचा ताबा घेतात.

**बहुराष्ट्रीय निगमची समकालीन आंतरराष्ट्रीय राजकरणातील प्रभाव :-**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियामध्ये बहुराष्ट्रीय निगमची भूमिका व प्रभाव मोठा असून आंतरराष्ट्रीय आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेतील धोरण व निर्णय प्रकियेत त्यांचा प्रभाव आहे. भांडवलशाहीचा जागतिक प्रसार करणे अशी निगमांची भूमिका महत्वाची असून शोषणावर आधारित नववसाहतवादी व्यवस्थेत भांडवलशाही राष्ट्र अशा कंपन्याना शोषणाचे साधन म्हणून वापर करून घेत असल्याचे दिसून येते.

**१. विलीनीकरणाच्या माध्यमातून प्रभाव :**

वस्तुमाल-सेवेची गुणवत्ता चांगली ठेवून कंपनी आपला धंदा थोड्याच काळात काही पटींनी वाढवू शकते. शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या कंपन्यांच्या कथा आपण ऐकतो. पण 'बी'पासून सुरुवात करून झाडाचा वटवृक्ष व्हावा ('ऑर्गॅनिक') तशा बहुराष्ट्रीय निगम 'महाकाय' झालेल्या नसतात. त्याच्या जोडीला 'इन-ऑर्गॅनिक' मार्ग अवलंबला जातो. अस्तित्वातील निगम खरेदी करून, आपल्यात विलीन (मर्जर्स अँण्ड अॅक्विझिशन) करून आकार वाढवला जातो. जगभर कंपन्यांच्या विलीनीकरणाचा उद्योग जोरात आहे. २०१५च्या बारा महिन्यांत त्यात चार ट्रिलियन्स डॉलरची (२५० लाख कोटी रुपये) उलाढाल झाली. ज्यात बहुराष्ट्रीय कंपन्यांचा वाटा लक्षणीय होता. स्पर्धकच एकमेकांत विलीन झाल्यामुळे काही उत्पादक क्षेत्रांमध्ये आपोआपच स्पर्धा कमी होते. मूठभर बहुराष्ट्रीय कंपन्याची जवळपास मक्तेदारी तयार होते. गुणवत्तेत तडजोड न करता, मक्तेदारीचा फायदा उठवत, या निगम वस्तुमाल-सेवांच्या किमती मनाप्रमाणे ठेवतात. त्यातून गडगंज नफा आणि अर्थातच आर्थिक ताकद कमावतात. या ताकदीतून अधिक निगम विकत घेणे, वेळ आलीच तर उत्पादन-केंद्र एका राष्ट्रातून दुसऱ्यात हलवणे व आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रभाव टाकणे साधले जाते.

**२. बहुराष्ट्रीयत्व :**

किमान वेतन, प्रदूषण नियंत्रणासारखे कायदे पाळताना कंपन्यांचा भांडवली व उत्पादनखर्च वाढतो; त्याप्रमाणात नफा कमी होतो. आयकर तर नफ्यातूनच जातो. साहजिकच यासंबंधातील कायदे-नियम कसे असणार यामध्ये कंपन्यांचे आर्थिक हितसंबंध गुंतलेले असतात. म्हणून त्यातील तरतुदींना 'हवा तसा' आकार देण्यासाठी निगम सर्व प्रयत्न करतात. तरीदेखील काही जाचक तरतुदी येतातच. अशा परिस्थितीत 'एकराष्ट्रीय' कंपन्यांना झालेले निर्णय राबवण्याशिवाय पर्याय नसतो; 'बहुराष्ट्रीय' कंपन्यांकडे मात्र असतो. 'आम्ही तुमच्या राष्ट्रात भांडवल गुंतवण्यास तयार आहोत, जर तुम्ही आमच्या सोयीचे कायदे अमलात आणणार असलात तरच' अशा धमकीवजा सूचना देत बहुराष्ट्रीय निगम राष्ट्रा-राष्ट्रांना (एवढेच नव्हे तर एकाच राष्ट्रातील विविध प्रांतांनादेखील) एकमेकांविरुद्ध खेळवू शकतात. एखाद्या राष्ट्राने त्यांच्याविरुद्ध कारवाईचा बडगा उगारलाच तर आपली धमकी प्रत्यक्षातदेखील आणतात. उदा. गेल्या काही दशकांत तयार कपडे बनवणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी, स्वस्त मजुरांचा फायदा उठवण्यासाठी आपले कारखाने चीन, बांगलादेशात हलवले; जमीन-हवा-पाण्याचे गंभीर प्रदूषण करणाऱ्या उत्पादन-प्रक्रिया, यासंबंधांतील कायदे शिथिल असणाऱ्या राष्ट्रात नेले (उदा. जगभरातून भंगारात काढलेली जहाजे, ई-वेस्ट भारतात) तर वस्तुमालाची विक्री शून्य आयकर असणाऱ्या राष्ट्रातून केली (उदा. पनामा, ब्रिटिश व्हर्जिनिया या टॅक्स हेवन्समध्ये).

**३. आंतरराष्ट्रीय संस्था–नेटवर्कचा भाग :**

जागतिक अर्थव्यवस्थेला निर्णायक आकार देण्याचे काम आंतरराष्ट्रीय संस्थांचे नेटवर्क करीत असते. जागतिक बँक, आयएमएफ, एडीबी, डब्ल्यूटीओ, युरोपीयन महासंघ, स्टॅण्डर्ड अँण्ड पुअर, मूडीज्सारख्या पतमापन संस्था जागतिक अर्थव्यवस्थेच्या खेळाचे यमनियम ठरवतात. यात डीलॉइट, प्राइसवॉटर, केपीएमजी, अंस्ट अँण्ड यंग या लेखापरीक्षण व सल्लागार निगम खूप मोठी भूमिका बजावतात. दावोससारखे थिंक-टँक्स, व्यवस्थापन व संशोधन संस्था विश्लेषणात्मक व वैचारिक पाठबळ पुरवतात. या साऱ्या संस्था-नेटवर्कच्या केंद्रस्थानी असतात बहुराष्ट्रीय निगम! या नेटवर्क-संस्थांमध्ये काम करणारे उच्चपदस्थ प्रोफेशनल्स एका खोलीतून सहजपणे दुसरीत गेल्याप्रमाणे वर उल्लेख केलेल्यांपकी एक संस्था सोडून दुसरीत करिअर व जास्तीच्या पॅकेजसाठी सहजपणे जा-ये करतात. या



PRINCIPAL
Shivaraj College of Arts,Commerce
& D.S.Kadam Science College,
GADHINGLAJ (Kolhapur)

डोळसपणे घडवून आणलेल्या 'अभिसरणा'तून एकजिनसी राजकीय आर्थिक तत्त्वज्ञान मानणाऱ्या प्रोफेशनल्सचे एक 'अभेद्य' नेटवर्क जागतिक पातळीवर तयार केले जाते. हेच नेटवर्क जागतिकीकरणाची प्रक्रिया गेली काही दशके राबवीत आहे.

**४. एकल राष्ट्रांची कोंडी :**

सार्वभौम एकल राष्ट्रे, म्हटले तर, स्वत:ची आर्थिक धोरणे स्वत: ठरवण्यास स्वायत्त असतात. पण बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या वरील तीनही शक्तिस्थानांमुळे बहुराष्ट्रीय निगम व एकल राष्ट्रांमधील संबंधांचे संदर्भ मुळापासून बदलतात. अनेक कारणांमुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या नफ्याच्या पातळीवर एकल राष्ट्राची स्थूल (मॅक्रो) अर्थव्यवस्थेबाबतीची धोरणेदेखील निर्णायक परिणाम करतात. उदा. अर्थसंकल्पीय तूट, चलनफुगवटा, व्याजदर, विनिमय दर इत्यादी. म्हणूनच बहुराष्ट्रीय निगम ज्या देशात धंदा करायचा त्या देशाची स्थूल आर्थिक धोरणे आपल्याला अनुकूल कशी होतील यासाठी प्रयत्नशील असतात. इथे आंतरराष्ट्रीय संस्थांचे त्यांचे नेटवर्क मोठी कामगिरी करते. एकल राष्ट्रे 'विशिष्ट' आर्थिक धोरणेच आत्मसात करतील हे पाहिले जाते. आंतरराष्ट्रीय भांडवलाला आकर्षित करण्याच्या खऱ्या-खोट्या दडपणातून एकल राष्ट्रे आयकर, कामगार, पर्यावरणासंबंधित कायद्यातील तरतुदी बहुराष्ट्रीय कंपन्यांना 'साजेशा' बनवतात. बऱ्याच वेळा काहीशा हतबलतेतून! २०१३ साली इक्वेडोरच्या पुढाकाराने ८५ विकसनशील राष्ट्रांनी युनोला निवेदन दिले आहे : 'बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या कारभारामुळे मानवाधिकाराची पायमल्ली, कामगारांच्या मूलभूत अधिकारांना दुय्यमत्व, पर्यावरणाच्या ऱ्हासाकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. याला आळा घालण्यासाठी युनोने पावले उचलावीत.' युनोच्या आमसभेचा ठराव झालाच तर मानवी हक्क, कामगारांचे हक्क, पर्यावरणाचे नुकसान यासंबंधातील राष्ट्रा-राष्ट्रांमधील कायदेशीर तरतुदींत सारखेपणा येण्यास मदत होईल. असे झाले तर एकल राष्ट्रांना परस्परांविरुद्ध खेळवणे बहुराष्ट्रीय कंपन्यांना कठीण जाईल अशी अपेक्षा आहे.

**सारांश :**

बहुराष्ट्रीय निगमांना मायदेशांतील सरकारांचे पाठबळ असल्याने आंतरराष्ट्रीय संबंधांबाबतही ते महत्त्वाची भूमिका बजावीत असतात. अलीकडील काळात आंतरराष्ट्रीय नाणेबाजारात निर्माण झालेल्या समस्यांचे मूळ या बहुराष्ट्रीय निगमांद्वारे मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या भांडवलाच्या आयात निर्यातींत सापडते. बहुराष्ट्रीय निगम केवळ भौगोलिक सीमा ओलांडून थांबत नाहीत, तर राष्ट्रवादी विचारसरणीलाही प्रसंगी उल्लंघून जातात. बहुराष्ट्रीय निगमांच्या प्रभावाचे हे आंतरराष्ट्रीय व दूरगामी स्वरूप लक्षात घेता त्यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्याबाबत संयुक्त राष्ट्रांच्या 'इकॉनॉमिक अँड सोशल कौन्सिल', 'अंक्टाड', आंतरराष्ट्रीय मजूर संघटना इत्यादींनी ठराव केलेले आहेत. तरीपण बहुराष्ट्रीय निगम जागतील विकसनशील देशाच्या कारभारावर प्रभाव पाडत असल्याचे दिसून येते.

**संदर्भसूची :**

1. Barnet. Richard J.; Muller. Ronald, E. Global Reach :The power of the Multinational Corporations, London, 1975. 2. Ghosh, D. K. Multinational Corporations in India : Trends and performance, Bombay, 1980. 3. Solomon, Lewis D. Multinational Corporations and the Emerging World Order, New York, 1978.
2. Falguni B. Vahanvale, "Educated Employment with References to Liberalisation, Privatisation and Globalisation", Ph.D Thesis Submitted to Gujrat University, Ahemedabad, 2009
3. Dr. Patnaik Prabhat, "Neo-liberalism and Democracy", Economic and Political Weekly, April 12, 2014, Vol. XLIX, No.5
4. प्रा.जगन करडे, "जागतिकीकरण : भारतासमोरील आव्हाने",डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००८
5. डॉ.नीलम सिंह, "भूमंडलीकरण और मानवअधिकार"अध्यन पब्लिशर, नई दिल्ली २०१२
6. लोकसत्ता वर्तमानपत्र



134